## वादीतर्फे साक्षीदार क्रमांक ०२ ची जबानी

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की**

| | | |
|---|---|---|
| माझे नांव | – | झिलू नारायण परब |
| माझे वय | – | ५० वर्षे, |
| व्यवसाय | – | शेती, |
| राहणार | – | मातोंड, भरभरेवाडी, ता.वेंगुर्ला जि.सिंधुदुर्ग. |

**वादींतर्फे सा.क्र.२ चा सरतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री.एम.एस.भणगे यांच्यामार्फत सुरु–**

मला न्यायालयामार्फत साक्षीसमन्स आलेले होते . त्यामुळे मी आजरोजी न्यायालयात साक्ष देण्यासाठी आलो आहे. मी सदाशिव विठ्ठल माळकर यांना ओळखत होतो. ते आजरोजी हयात नाहीत. मयत सदाशिव विठ्ठल माळकर हे निलेश मनोहर माळकर यांचे आजोबा होते. निलेश मनोहर माळकर हा त्यांचा नातू आहे. दि. १९/०२/२००९ रोजी मला सदाशिव विठ्ठल माळकर यांनी मृत्यूपत्र करण्यासाठी कामानिमित्त बोलाविले होते. त्यांनी मला सांगितले होते की मृत्यूपत्र करावयाचे आहे , तेव्हा २० तारेखला या. दि. २०/०२/२००९ रोजी मी सदाशिव माळकर यांच्या घरी सकाळी ७ .०० ते ७.३० वाजता गेलो. तेथे चंद्रकांत परब यांची रिक्षा होती. रविंद्र मातोंडकर हे सदाशिव माळकर यांच्या घरी उपस्थित होते . सदाशिव माळकर, मी स्वतः आणि आत्माराम सावंत असे आम्ही सर्व रिक्षामध्ये बसलो व तळवडे येथे गेलो. सदाशिव माळकर हे डॉ. सावंत यांच्याकडे गेले. त्यांना वैद्यकीय प्रमाणपत्र घ्यावयाचे होते. ते वैद्यकीय प्रमाणपत्र घेवून आले व रिक्षात बसले. त्यानंतर आम्ही सर्व रिक्षात बसून वेंगुर्ला येथे प्रभूखानोलकर यांच्या कार्यालयात आलो. तेथे रविंद्र मातोंडकर हे त्यांच्या मोटारसायकलने आले होते. सदाशिव माळकर यांनी वकील प्रभूखानोलकर यांना माझे मृत्यूपत्र तयार झाले काय असे विचारले. त्यांनी हो म्हणून सांगितले. वकील प्रभूखानोलकर यांनी मृत्यूपत्र सदाशिव माळकर यांना वाचून दाखविले. वकील प्रभूखानोलकर यांनी मृत्यूपत्रातील मजकूर बरोबर आहे काय असे सदाशिव माळकर यांना विचारले. सदाशिव माळकर यांनी उत्तर हो म्हणून दिले. वकील प्रभूखानोलकर यांनी आम्हाला सहदुय्यम निबंधक कार्यालय वेंगुर्ला येथे गिरप या व्यक्तीकडे जाण्यासाठी सांगितले. आम्ही सर्व रिक्षेने सहदुय्यम निबंधक कार्यालय

वेंगुर्ला येथे गिरप यांच्याकडे गेलो. आमच्या मागून रविंद्र म्हापणकर हा मोटारसायकलने तेथे आला. गिरप यांनी मृत्यूपत्र सदाशिव माळकर यांना वाचून दाखविले व ते बरोबर आहे का ? असे विचारले. सदाशिव माळकर यांनी आम्हा सर्वांसमक्ष हो असे उत्तर दिले. सदाशिव माळकर यांची सही व अंगठा गिरप यांनी मृत्यूपत्रावर घेतली . नंतर माझी सही मृत्यूपत्रावर घेतली. आत्माराम सावंत यांची सही देखील मृत्यूपत्रावर घेतली. गिरप यांनी देखील त्यांची सही मृत्यूपत्रावर केली. त्यानंतर गिरप, सदाशिव माळकर, रविंद्र मातोंडकर व रिक्षा चालक चंद्रकांत परब असे सर्व मृत्यूपत्र नोंदणी करण्यासाठी आत कार्यालयात गेले . मी व आत्माराम सावंत आम्ही दोघे रिक्षामध्ये थांबलो . एक ते दिड तासानंतर गिरप, सदाशिव माळकर, रविंद्र मातोंडकर व चंद्रकांत परब हे सर्व कार्यालयातून बाहेर आले. ते सर्व रिक्षात बसले. त्यानंतर आम्ही सर्व घरी गेलो . मला मृत्यूपत्र दाखविल्यास मी ते मृत्यूपत्र व माझी त्यावरील सही ओळखू शकतो . (साक्षीदाराला दि. २०/०२/२००९ रोजीच्या मृत्यूपत्राची मूळप्रत दाखविण्यात आली.) ही तीच आहे. त्यावर माझी साक्षीदार म्हणून सही आहे. तसेच, त्यावर सदाशिव माळकर यांची सही व अंगठा आहे . तसेच, त्यावर गिरप यांची सही आहे. तसेच त्यावर दुसरे साक्षीदार आत्माराम सावंत यांची सही आहे. सर्वांच्या सह्या मी ओळखतो. त्यांनी त्या सह्या माझ्यासमक्ष मृत्यूपत्रावर केलेल्या आहेत. **(मृत्यूपत्राला निशाणी १४८ देण्यात येते.)**

**उलटतपास प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री.आर.एस.गव्हाणकर यांच्यामार्फत सुरु–**

०२. मी मृत्यूपत्रावर दि. २०/०२/२००९ रोजी सकाळी ११.३० वाजता सही केली आहे. माझ्यासमक्ष मृत्यूपत्र तयार केले गेले. साक्षीदार पुन्हा विचारल्यावरुन सांगतो की मृत्यूपत्र हे अगोदरच तयार करुन ठेवले होते. मी फक्त त्यावर सही केली. मृत्यूपत्राचा कच्चा मसुदा तयार केलेला होता. कच्चा मसुदा मला वाचायला दिला नव्हता . मृत्यूपत्र हे किती रुपयांच्या स्टॅम्पपेपरवर केले होते हे मला सांगता येणार नाही . हे म्हणणे खरे आहे की स्टॅम्प पेपरवर मृत्यूपत्र केले गेले. हे म्हणणे खरे आहे की वकील प्रभूखानोलकर यांनी तयार केलेल्या मृत्यूपत्रावर मी सही केली. मृत्यूपत्रात पाच ते सहा पाने होती. साक्षीदार पुन्हा विचारलेवरुन सांगतो की मृत्यूपत्रात किती पाने होती हे मला सांगता येणार नाही. मृत्यूपत्र हे पाठपोठ नव्हते. ते एका स्वतंत्र पानावर होते. माझी केवळ मृत्यूपत्राच्या शेवटच्या पानावर एकच सही घेण्यात आली. मी साक्षीदार म्हणून मृत्यूपत्रावर अनुक्रमांक १ वर सही केली. दोनच साक्षीदार हजर

होते. मृत्यूपत्राच्या प्रत्येक पानावर मी सही केली नाही. मृत्यूपत्राच्या जोड पानांवर अर्धी सही मी केली नाही. मृत्यूपत्र हे वकील प्रभूखानोलकर व गिरप यांनी वाचून दाखविले. मृत्यूपत्र वाचून दाखविताना तेथे मी स्वतः, माझ्यासोबत सदाशिव माळकर, आत्माराम सावंत, रविंद्र मातोंडकर, रामचंद्र परब हे सर्व हजर होते. गिरप यांनी मृत्यूपत्रामधील मजकूर वाचून दाखविला तो मी ऐकला. मृत्यूपत्रामध्ये कोणतीही खाडाखोड नव्हती. मी मृत्यूपत्रावर सही करताना कोणतीही खाडाखोड नव्हती. मी एकाच पेनाने मृत्यूपत्रावर सही केली. मी निळ्या शाईच्या बॉलपेनाने मृत्यूपत्रावर सही केली. मृत्यूपत्रावर मी तसेच आत्माराम सावंत यांनी सह्या केल्या होत्या. सदाशिव माळकर यांच्या डाव्या हाताचा अंगठा इंक पॅडमध्ये घालून मृत्यूपत्रावर उमटविला. सदाशिव माळकर यांच्या मृत्यूपत्रावरील डाव्या हाताच्या अंगठ्याला कोणीही ओळख घातली नाही. डॉक्टरांचा वैद्यकीय दाखला मृत्यूपत्रासोबत होता. डॉक्टरांनी सदाशिव माळकर हे मृत्यूपत्र करण्यापुर्वी शारिरीक व मानसिक दृष्टया सक्षम आहेत असा दाखला दिला होता. डॉक्टरांचा दाखला हा स्वतंत्र पानावर होता. डॉक्टरांनी दिलेला दाखला हा कोणत्या भाषेत होता हे मी पाहिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की सदाशिव माळकर यांची मनःस्थिती बरी नव्हती. सदाशिव माळकर यांनी त्यांचा हिस्सा हा त्यांचा नातू निलेश माळकर यांच्या नावे केला. सदाशिव माळकर यांच्या पुतण्याचा मुलगा म्हणजेच निलेश माळकर होय. सदाशिव माळकर यांनी त्यांच्या कोणत्या मिळकतीतील कितवा हिस्सा निलेश माळकर यांना दिला हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की मृत्यूपत्र मला कोणी वाचून दाखविले नाही, माझ्यासमक्ष कोणीही वाचले नाही. हे म्हणणे खरे नाही की सदाशिव माळकर यांनी त्याचा अंगठा व सही मृत्यूपत्रावर केली नाही. मनोहर माळकर हा मृत्यूपत्र करताना हजर नव्हता. निलेश माळकर हा हजर होता. मृत्यूपत्र तयार करण्याचे काम दुपारी २ .०० वाजेपर्यंत आटोपले. (साक्षीदाराला निशाणी १४८ कडील मृत्यूपत्र दाखविण्यात आले.) हे म्हणणे खरे आहे की सदाशिव माळकर यांच्या मृत्यूपत्रावरील डाव्या हाताच्या अंगठ्याला कोणीही ओळख दिली नाही. हे म्हणणे खरे आहे की मृत्यूपत्रामध्ये एकूण सात पाने आहेत. हे म्हणणे खरे आहे की मृत्यूपत्राच्या सातव्या पानावर डॉक्टराचा दाखला असून पानाला अनुक्रमांक दिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की डॉक्टरांच्या दाखल्यावर जावक क्रमांक दिसून येत नाही. हे म्हणणे खरे आहे की मृत्यूपत्राच्या शेवटच्या पानावर ज्यावर डॉक्टरांचा दाखला चिकटविलेला आहे त्या जोडपानावर दुय्यम निबंधक यांचा सही व शिक्का नाही. हे म्हणणे खरे

आहे की मृत्यूपत्र हे स्टॅम्प पेपरवर केलेले नाही.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.** **श्रवणोत्तर स्विकृत.**

सही/-
(के.के.पाटील)
दिनांक- ११/०८/२०२३. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वेंगुर्ला.

.